Postal Lic./AMT/RNP/492/2026-2028

वरुड | सोमवार
१८.०५.२०२६

वरुड **दर्पण**

RNI REGD.NO.MAHMAR/2019/78235
chandubhad@gmail.com
www. waruddarpan.com
9422157712, 8669533485

वर्ष: ०७ | अंक: १६ | पृष्ठे: ०६ | किंमत: ०२

संपादक - चंद्रकांत भा. भड

+91 7745067712

## थोडक्यात

### भर कार्यक्रमात महसूलमंत्र्यांना कागदाने वारा!

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

*अमरावती* - राज्याच्या राजकीय वतुर्ळात सध्या एका अनोख्या व्हिडिओची जोरदार चर्चा रंगली आहे. अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'जनता दरबार' कार्यक्रमात भाजपच्या महिला शहराध्यक्षा मेघा भारती यांनी चक्क महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना कागदाने वारा घातल्याचा प्रकार समोर आला आहे. या घटनेचा व्हिडिओ सोशल मीडियावर वाऱ्यासारखा पसरला असून, त्यावर विविध प्रतिक्रिया उमटत आहेत. दर्यापूर येथे नागरिकांच्या समस्या जाणून घेण्यासाठी आणि त्यांच्या प्रलंबित तक्रारींचे निवारण करण्यासाठी स्थानिक प्रशासन आणि महसूलमंत्र्यांच्या उपस्थितीत एका जनता दरबाराचे आयोजन आले होते.

# नीट पेपरफुटी प्रकरणात मोठी कारवाई!

## शिवराज मोटेगावकर सीबीआयच्या ताब्यात

## विशेष न्यायालयात हजर होणार

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**लातूर** - देशभरात संतापाची लाट निर्माण करणाऱ्या नीट पेपरफुटी प्रकरणात केंद्रीय अन्वेषण विभागाने मोठी आणि निर्णायक कारवाई केली आहे. या प्रकरणातील संशयित प्रो. शिवराज मोटेगावकर यांना सीबीआयने ताब्यात घेतले असून, आज त्यांना विशेष न्यायालयात हजर करण्यात येणार असल्याची माहिती समोर आली आहे.

नीट परीक्षेतील कथित गैरप्रकारामुळे लाखो विद्यार्थ्यांच्या भवितव्यावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले होते. प्रामाणिकपणे अभ्यास करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मेहनतीवर पाणी फेरणाऱ्या या रॅकेटचा पर्दाफाश करण्यासाठी सीबीआयने देशभरात तपासाची व्याप्ती वाढवली आहे.

त्याच तपासादरम्यान लातूर कनेक्शन समोर आले आणि प्रोफेसर शिवराज मोटेगावकर यांचे नाव चर्चेत आले सूत्रांच्या माहितीनुसार, सीबीआयने काही दिवसांपासून मोटेगावकर यांच्यावर बारकाईने लक्ष ठेवले होते. त्यांच्या कार्यालयासह काही ठिकाणी चौकशी आणि दस्तऐवजांची तपासणी करण्यात आली होती. डिजिटल पुरावे, आर्थिक व्यवहार आणि संशयित संपर्कांची माहिती गोळा केल्यानंतर ही कारवाई करण्यात आल्याचे सांगितले जात आहे.

सीबीआयच्या या पावलामुळे आता तपासाला वेग मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. तपास यंत्रणांना या रॅकेटमधील इतर महत्त्वाच्या व्यक्तींपर्यंत पोहोचण्यासाठी मोठे धागेदोरे मिळू शकतात, अशी चर्चा सुरू आहे. विशेषतः पेपरफुटीच्या संपूर्ण नेटवर्कमध्ये कोचिंग सेंटर, एजंट आणि इतर मध्यस्थांचा सहभाग होता का, याचाही तपास केला जात आहे.

दरम्यान, मोटेगावकर यांना न्यायालयीन कोठडी मिळाल्यास सीबीआय त्यांची सखोल चौकशी करणार असल्याची माहिती आहे.

या चौकशीतून अनेक धक्कादायक खुलासे समोर येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पेपरफुटीचे मुख्य सूत्रधार कोण, प्रश्नपत्रिका कशा लीक झाल्या, आर्थिक व्यवहार कुठून झाले आणि देशभरात हे जाळे किती मोठे होते, याबाबत तपास यंत्रणा माहिती गोळा करत आहेत.

# उत्तर प्रदेशामध्ये ट्रक-मॅजिकच्या धडकेत १० जणांचा मृत्यू

(प्रतिनीधी वरुड दर्पण)




**लखनौ** - येथील लखीमपूर खेरी येथे सोमवारी सकाळी साडेसात वाजण्याच्या सुमारास झालेल्या भीषण रस्ते अपघातात १० जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला. पीलीभीत-बस्ती महामार्गावर अदलीसपूर गावाजवळ भरधाव ट्रकने समोरून येणाऱ्या मॅजिक वाहनाला जोरदार धडक दिली. या भीषण धडकेत मॅजिक वाहनाचा पूर्ण चक्काचूर झाला. वाहनात दोन महिलांसह अंदाजे एकूण १२ जण प्रवास करत होते. अपघात इतका भयंकर होता की सर्वांचा जागीच मृत्यू झाला, तर एका गंभीर जखमीचा उपचारासाठी नेत असताना मृत्यू झाला.

प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, मॅजिक वाहन लखीमपूरहून सिसैया दिशेकडे जात होते. त्याचवेळी बहराइचकडून येणारा ट्रक भरधाव वेगात होता. अचानक चालकाचे ट्रकवरील नियंत्रण सुटले आणि ट्रकने समोरून येणाऱ्या मॅजिक वाहनाला जबर धडक दिली. धडक इतकी प्रचंड होती की मॅजिक वाहन जवळपास दहा फूट अंतरापर्यंत फरफटत गेले आणि रस्त्याच्या कडेला जाऊन थांबले. अपघातानंतरचे दृश्य अत्यंत हृदयद्रावक होते. मॅजिक वाहनात बसलेले अनेक प्रवासी सीटच्या मध्येच अडकून पडले होते. काहींची डोकी फुटली होती, तर एका व्यक्तीचा संपूर्ण चेहरा फाटल्याची माहिती समोर आली आहे. धडकेच्या तीव्रतेमुळे दोन प्रवासी वाहनाबाहेर फेकले गेले आणि रस्त्यावर पडले. त्यांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली होती. घटनास्थळी सर्वत्र रक्ताचे डाग पसरले होते. आसपासच्या नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेत मदतकार्य सुरू केले आणि पोलिसांना माहिती दिली.

# जात वैधता प्रमाणपत्र : सरकारचा हस्तक्षेप नाही

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा खुलासा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



*मुंबई* - जात वैधता प्रमाणपत्रांच्या संदर्भात सर्वोच्च न्यायालयाने नेमलेल्या समितीच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार प्रक्रिया सुरू असून त्यात सरकारचा कोणताही हस्तक्षेप नाही, असे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी पुण्यात स्पष्ट केले.

सातारा गॅझेट लागू करण्याबाबत विधी व न्याय विभागाच्या सल्ल्यानुसार आणि न्यायालयीन प्रक्रियेचा आदर राखूनच पावले उचलली जात असल्याचेही त्यांनी नमूद केले.

मराठा आरक्षण प्रश्नी पुन्हा एकवार उपोषण करण्याचा इशारा मनोज जरांगे यांनी दिला आहे. त्या पार्श्वभूमीवर फडणवीस बोलत होते. विद्यमान सरकारने मराठा समाजासाठी जेवढे काम केले आहे, तेवढे महाराष्ट्राच्या इतिहासात कधीही झाले नसल्याचा दावाही त्यांनी यावेळी केला.

राज्य सरकारने मराठा समाजासाठी अनेक महत्त्वाचे निर्णय घेतले आहेत. 'सारथी' संस्थेच्या माध्यमातून आज अनेक तरुण स्पर्धा परीक्षांमध्ये यश मिळवत आहेत, तर अण्णासाहेब पाटील आर्थिक विकास महामंडळाने विक्रमी संख्येत उद्योजक तयार केले आहेत. ज्या विद्यार्थ्यांना हॉस्टेलमध्ये जागा मिळत नाही, त्यांच्यासाठी निर्वाह भत्ता योजना सुरू आहे, असे ते म्हणाले.

महाराष्ट्रात कोणतेही ऊर्जा संकट नाही. राज्याकडे आवश्यकतेपेक्षा जास्त वीज उपलब्ध असून, केवळ ग्रीड बिघाडामुळे काही ठिकाणी तात्पुरती समस्या उद्भवू शकते, असेही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले.

# विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूका जाहीर

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



*मुंबई* - पावसाळी अधिवेशनाआधी विधान परिषदेच्या सदस्यसंख्येत आणखी भर पडणार आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधान परिषदेच्या १७ जागांसाठी निवडणूक जाहीर करण्यात आली आहे. १८ जून रोजी मतदान तर २२ जून रोजी मतमोजणी होणार आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाच राज्यात न झाल्याने या मतदारसंघामध्ये पूर्वी निवडून आलेल्या आमदारांचा कार्यकाळ संपुष्टात येऊनही निवडणूक होऊ शकली नाही. अशात, गेल्या दोन अडीच वर्षांपासून आमदारकीच्या जागा रिक्त आहेत. स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघातील एकूण मतदार संख्येच्या ७५ टक्के मतदार संख्या असेल तर विधान परिषदेची निवडणूक घेता येते.

विधान परिषदेच्या एकूण ७८ सदस्य संख्येपैकी २२ सदस्य स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे निवडून जात असतात विधानपरिषद निवडणूकीचा संपूर्ण कार्यक्रम निवडणुकीची अधिसूचना- २५ मे, अर्ज भरण्याची शेवटची तारीख- १ जून, उमेदवारी अर्जांची छाननी- २ जून, अर्ज माघारीची मुदत- ४ जून, मतदान- १८ जून (स.८ ते दु.४), मतमोजणी- २२ जून, पुढील मतदारसंघात होऊ शकते निवडणूक सोलापूर, अहिल्यानगर, ठाणे, जळगाव, सांगली-सातारा, नांदेड, यवतमाळ, पुणे, भंडारा-गोंदिया, रायगड-रत्नागिरी-सिंधुदुर्ग नाशिक, वर्धा-चंद्रपूर-गडचिरोली, अमरावती, धाराशिव-लातूर-बीड, परभणी-हिंगोली, छत्रपती संभाजी नगर-जालना, नागपूर.

# भारताला फटका बसणार?

## रशियातून तेल खरेदीची सूट अमेरिकेकडून रद्द

(प्रतिनीधी वरुड दर्पण)



*नवी दिल्ली* - अमेरिका आणि इराण यांच्यातील संघर्षाच्या काळात रशियन तेल खरेदीवर अमेरिकेकडून सूट देण्यात आली होती. मात्र, आता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी या सवलतीची मुदत वाढवण्यास नकार दिला आहे.

हा भारतासाठी मोठा धक्का मानला जात असून देशात पेट्रोल आणि डिझेल यासह इतर इंधनांचे दर वाढण्याची शक्यता आहे रशिया आणि यूक्रेन यांच्यातील युद्धानंतर अमेरिका आणि यूरोपियन देशांनी रशियावर कठोर निर्बंध लादले होते. मात्र, मार्च २०२६ मध्ये इराण युद्ध सुरु झाल्याने आणि होर्मुझ बंद झाल्याने जागतिक बाजारात तेल संकट गडद झाले. परिणामी ट्रम्प सरकारने मार्च २०२६ मध्ये ही सूट दिली होती, ती सूट १६ मे पर्यंत वाढवण्यात आली होती. आता ती मुदत संपली आहे.

मार्च २०२६ मध्ये होर्मुझच्या सामुद्रधुनीवरुन तणाव वाढल्याने भारताने रशियाकडून तेल खरेदी वाढवली होती. मार्च २०२६ मध्ये प्रतिदिन साडेचार दशलक्ष बॅरल तेल आयात केले होते. यामध्ये जवळपास ५० टक्के तेल रशियाकडून खरेदी केले होते. एप्रिलमध्ये भारताने रशियाकडून सर्वाधिक तेल खरेदी केले.

# एआय आणि डेटा ॲनालिटिक्सचा समावेश सीएच्या अभ्यासक्रमात होणार

## बदलत्या तांत्रिक, व्यावसायिक बदलांशी सुसंगत राहण्यासाठी 'आयसीएआय'चा प्रयत्न

(प्रतिनिधी वरुड दर्पण)



*नवी दिल्ली* - चार्टर्ड अकाउंटंट्सची सर्वोच्च संस्था 'आयसीएआय' बदलत्या तांत्रिक आणि व्यावसायिक बदलांशी सुसंगत राहण्यासाठी अभ्यासक्रमात आर्टिफिशिअल इंटेलिजन्स, डेटा ॲनालिटिक्स आणि इतर विषयांचा समावेश करणार आहे. इन्स्टिट्यूट ऑफ चार्टर्ड अकाउंट्स ऑफ इंडियामध्ये सध्या लाखो विद्यार्थी चार्टर्ड अकाउंटंटचा अभ्यासक्रम पूर्ण करत आहेत, तर या संस्थेचे ५ लाखांहून अधिक सदस्य आहेत. आयसीएआयचे अध्यक्ष प्रसन्न कुमार डी.यांनी पीटीआयला दिलेल्या मुलाखतीत सांगितले की, तंत्रज्ञान आता अग्रस्थानी येत असल्यामुळे अभ्यासक्रमातील विषयांमध्ये एआय आणि डेटा ॲनालिटिक्सचा प्रामुख्याने समावेश करणे आवश्यक आहे. संस्थेने नुकतीच शिक्षण आणि प्रशिक्षण पुनरावलोकन समिती स्थापन केली आहे, जी आगामी महिन्यांत अभ्यासक्रमातील अद्ययावत बदलांसह आपल्या शिफारशींना अंतिम रूप देईल अशी अपेक्षा आहे. बिगर-आर्थिक रिपोर्टिंग, ईएसजी डिस्क्लोजर्स, एआय, डेटा ॲनालिटिक्स आणि फॉरेन्सिक ऑडिटिंगवर वाढत्या लक्षामुळे अकाउंटन्सी व्यवसायात बदल झाला आहे. आम्ही 'क्रेट' समिती स्थापन केली आहे. अभ्यासक्रम, कोणते विषय बदलणे आवश्यक आहे आणि प्रशिक्षण या संपूर्ण रचनेचे पुनरावलोकन करण्याचे काम ही समिती करत आहे.



## मुंबईची आरोग्य व्यवस्था बळकट होणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**मुंबई** – स्वस्त व योग्य उपचार पद्धती यामुळे देशभरातील रुग्ण मुंबई महापालिकेच्या रुग्णालयात उपचारासाठी धाव घेतात.

पालिकेच्या रुग्णालयात दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्याबरोबर आरोग्य संस्थांचा परिसर स्वच्छ व अतिक्रमण मुक्त करा, सहाय्यक आयुक्तांनी आरोग्य संस्थांची नियमित पाहणी करावी, असे निर्देश मुंबई महापालिका आयुक्त अश्विनी भिडे यांनी दिले. मुंबई महापालिकेच्या विविध विभागातील कामाचा आढावा त्यांनी घेतला. त्यावेळी त्या बोलत होत्या. 'मुंबई महापालिकेची सुमारे ५०० हून अधिक आरोग्य केंद्रे, प्राथमिक आरोग्य सेवा केंद्रे, 'हिंदुहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे आपला दवाखाना', पॉलिक्लिनिक, भर प्रसूतिगृहे, विशेषोपचार रुग्णालये आणि वैद्यकीय महाविद्यालये कार्यरत आहेत.


### लोणी करजगांव रस्त्यावरील गजानन महाराज मंदीर येथे

## शेकडो भाविकांच्या उपस्थितीत आज श्री साई पारायण

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – गजानन महाराज मंदीर लोणी करजगांव रोड या ठिकाणी रामनवमीचे दुसऱ्या दिवशी तिथी-निश्चित प्रमाणे चैत्र शुध्द ९ म्हणजे २६ मार्च २०२६ ला साई बाबा व हनुमंतराय यांची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. त्या अनुषंगाने उद्या १७ मे २०२६ ला पुरुषोत्तम अधिक मासचा शुभारंभ साईबाबाचे अशीम कृपेने या ठिकाणी श्री. साई पारायणाचे आयोजन करण्यात आलेले आहे. उद्या १७ मे २०२६ ला पहाटे ५ वाजता श्री. साई पादुका मंगल स्नान व काकडा आरती व लगेच साई पारायणाला सुरुवात व सायंकाळी ७ वाजता साई महाआरती व प्रसाद वितरण करण्याचे आवाहन साई पालखी सोहळा शेंदुरजनाघाटचे सर्व भक्त व सेवेधारी यांनी केलेली आहे.

तसेच दररोज सायंकाळी अधिक मास संपेपर्यंत महिला व पुरुषाचे भजन व धार्मिक कार्य या मंदीरामध्ये करण्यात येणार आहे. सर्व सोईयुक्त मंदीर असल्यामुळे या ठिकाणी



भाविक मंडळी दर्शन घेण्याकरीता येतात. तसेच भक्त लोक या ठिकाणी दर्शन घेण्याकरीता थांबतात. जेणेकरुन या ठिकाणी माणसाला समाधान मिळते. व ३१ मे २०२६ ला मुखोदगत पारायणकर्त्या अर्चना संदीप देशपांडे, पुणे यांचे पारायण सोहळा संपन्न होणार आहे.

परिसरातील भाविकांनी या पारायणाला बसण्याचे आवाहन सुध्दा करण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजक शे.घाट परिसरातील सर्व भक्त व सेवेकरी श्री गजानन महाराज मंदीर लोणी-करजगांव रोड असून याकरीता दिवाकर मगर्दे , पुरुषोत्तम धोटे, वैभव दुधे, निखील कडू, सुधा ढोणे, गजानन बखाल, नारायण चिमोटे, देविदास कुयटे, सचिन बहुरुपी, भाग्यश्री आंडे, सुनंदा सातंगे, उमेश बाहे हे असून अधिक माहीती करीता ह.भ.प.प्रमोद महाराज दुधे (मोबा. ७९७२५५०५१९) यांचेशी संपर्क साधावा, असे आवाहन एका प्रसिध्दीपत्रकाद्वारे करण्यात आले आहे.

### प.पु.श्री.श्री.रविशंकरजी यांच्या ७० व्या जन्म दिवसानिमित्य

## गुरूपुजा, दिव्य सत्संग व गुरूप्रसाद कार्यक्रम

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**वरुड** – प.पु.श्री श्री रविशंकरजी यांच्या ७० व्या जन्म दिवसाचे औचित्य साधून आयोजित भव्य आनंद अनुभूतीचा गुरुपूजा करुन दिव्य सत्संगाचा शहरातील साधकांनी मोठ्या संख्येने आनंद घेतला.




ज्यामध्ये शहरातील सर्व सामाजिक संघटनांतील प्रमुख मान्यवरांनी सहभाग दर्शविला तसेच गुरुदेवांच्या वाढदिवसानिमित्याने नवनिर्वाचित नगराध्यक्ष, नगरसेवक यांचा गुरुदेवांची प्रतिमा व लक्ष्मीतरु वृक्षाचे झाड देऊन तसेच स्मशानभुमिमध्ये रात्रंदिवस सेवा देणाऱ्या प्रभा नामक महिलेचा साडी चोळी देवुन या शुभपर्वावर आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार वरुड तर्फे सन्मान करण्यात आला.

यावेळी गुरुदेवांच्या आवाजातील तणावमुक्तीचे ध्यान घेण्यात आले. शहरातील या दिव्य वाढदिवसाला शहरातील नामांकित डॉक्टर, वकिल, पत्रकार, व्यापारी अशा विविध क्षेत्रातील मान्यवरांनी हजेरी लावली असता दिव्य सत्संगासह भोजनाचा आस्वाद घेतला. विशेषत: या कार्यक्रमाकरिता प्रशिक्षक नयना दिदी, आर्ट ऑफ लिविंगचे जिल्हा समन्वयक अशोक नानोटकर, विजय अढाऊ, मनोज शेंडे, राहुल लोखंडे, गौरी तडोकर, अजिंक्य खेरडे, राजू घाटोळे, रुपेश भोयर, रुपराव वरुडकर, पंकज गोहाड, विजय निकम, आकाश भोजने, माधुरी निकम, रजत वाडबुदे, निलेश अळसपुरे, प्रा.किशोर तडस व सर्व सेवा योद्धा आर्ट ऑफ लिव्हिंग परिवार वरुड यांनी अथक प्रयत्न केले तसेच आर्ट ऑफ लिविंगचे जिल्हा समन्वयक अशोक नानोटकर यांनी उपस्थितांचे व सर्व साधकांचे आभार मानले.

## बेनोडा येथे उत्क्रांती सहकारी संस्थेची आढावा बैठक

**सभेमध्ये कर्मचारी, संग्राहकांना अध्यक्षांनी केले मार्गदर्शन**

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**जरुड** – येथील उत्क्रांती नागरी सहकारी पत संस्थेचे शाखा बेनोडा येथे आढावा सभा संपन्न झाली असुन संस्थेने केलेल्या आर्थिक प्रगती बाबत आढावा घेण्यात आला.

यात ३१ मार्च २०२६ या आर्थिक वर्षाला संस्थे जवळ १४९ कोटी रुपयांच्या ठेवी असुन ८० कोटी



रुपयांचे कर्ज वाटप करण्यात आले व चालु आर्थिक वर्षात ३ कोटी ५२ लाख रुपये ढोबळ नफा मिळाला असल्याचे संस्थेचे अध्यक्ष रामराव वानखडे यांनी सांगितले. जिल्ह्यात १ हजार कोटी रुपयांच्या वर उलाढाल करणारी उत्क्रांती नागरी सहकारी संस्था असल्याचे मत उपाध्यक्ष डॉ.अशोक खोपे यांनी मांडले. सभेमध्ये कर्मचारी, संग्राहक यांना अध्यक्षांनी मार्गदर्शन केले. यावेळी मंचावर संचालक गजानन बिजवे, पालक संचालक डॉ.साहेबराव पाटील, साहेबराव घारड, प्रकाश तिजारे, सरव्यवस्थापक राजीव शेलकर, बेनोडा शाखा व्यवस्थापक अंकुश वानखडे उपस्थित होते.

सभेचे संचालन रविंद्र वसुले तर आभार अंकुश वानखडे यांनी मानले. कार्यक्रमाचे यशस्वितेकरीता गीतेश कडे, प्रविण सव्वालाखे, प्रदीप भोदे, आशिष खाजबागे, निलेश मानेकर, सुरेखा बारमासे, आंचल फुसे, कांचन दारोकर व सर्व संग्राहक यांनी सहकार्य केले.

### तापमान

| | कमाल | किमान |
|---|---|---|
| अमरावती | २९ | २४ |
| यवतमाळ | २८ | २१ |
| अकोला | २७ | २४ |
| वाशिम | २८ | २३ |
| बुलढाण | २७ | २२ |
| वर्धा | ३० | २३ |
| नागपूर | २९ | २४ |
| चंद्रपुर | २९ | २५ |
| गडचिरोली | २८ | २३ |
| नाशिक | २६ | २२ |
| पुणे | ३० | २१ |

## व्ही.डी.सतीशन केरळ मुख्यमंत्रीपदाची शपथ घेणार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**केरळ** – काँग्रेस नेते व्ही. डी. सतीशन आज (१८ मे) केरळच्या मुख्यमंत्रीपदी शपथ घेतील.

हा सोहळा तिरुवनंतपुरम येथील सेंट्रल स्टेडियममध्ये होईल. राहुल गांधी, मल्लिकार्जुन खर्गे आणि प्रियांका गांधी वाड्रा हे देखील या सोहळ्याला उपस्थित



राहणार आहेत. शशी थरूर परदेशात असल्याने उपस्थित राहणार नाहीत. सतीशन हे सलग सहावेळा परवूरचे आमदार राहिले आहेत. केरळ मंत्रिमंडळात चौदा आमदार मंत्री म्हणून शपथ घेतील. यामध्ये सी. पी. जॉन आणि एन. शमसुद्दीन, के. एम. शाजी, पी. के. बशीर आणि व्ही. ई. अब्दुल गफूर, पी. सी. विष्णूनाथ, रोझी एम. जॉन, बिंदू कृष्णा, टी. सिद्दिकी, के. ए. तुळसी आणि ओ. जे. जनिश यांचा समावेश आहे. काँग्रेसने सभापती आणि उपाध्यक्ष ही पदे आपल्याकडे ठेवली आहेत.

थिरुवनचूर राधाकृष्णन यांची सभापती आणि शनिमोल उस्मान यांची उपाध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली आहे. विधानसभा निवडणुकीचे निकाल जाहीर झाल्यानंतर दोन आठवड्यांनी केरळमध्ये यूडीएफ सरकार स्थापन होणार आहे.

## इयत्ता १२ वीच्या परिक्षेत प्रशिक इंगळे याला ९१ टक्के गुण

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – नुकत्याच जाहीर झालेल्या सीबीएससी इयत्ता १२ वी बोर्ड परीक्षेत अमरावतीच्या अभ्यासा इंग्लिश स्कूलचा विद्यार्थी प्रशिक जितेंद्र इंगळे या विद्यार्थ्याने उल्लेखनीय यश प्राप्त करीत ९१ टक्के गुण प्राप्त केले आहे.

प्रशिक हा वरुड शहरातील प्रतिष्ठीत नागरिक प्रकाश कासोर्दे



यांचा नातु असून त्याला जिवशास्त्र् या विषयाात ९५ गुण, इंग्रजी या विषयात ९४ गुण तर शारिरीक शिक्षण विषयामध्ये ९३ गुण मिळाले आहेत.

प्रशिकने मिळविलेल्या या उल्लेखनीय यशाबददल त्याचे सर्वत्र कौतूक होत असून तो त्याच्या यशाचे श्रेय वडिल जितेंद्र, आई पुनम, आजोबा प्रकाश कासुर्दे, आजी सुनंदा आणि मामा सुरज यांचेसह वर्गशिक्षक, शाळेचे प्राचार्य व इतर शिक्षकांना देतो.

## राजस्व मंडळ शेंदूरजनाघाट येथे आमदारांच्या उपस्थितीत छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**वरुड** – महसूल विभागामार्फत ग्रामीण भागातील सर्वसामान्य जनता, शेतकरी, विद्यार्थी व महिलांचे महसूल विभागाशी संबंधित दैनंदिन प्रश्न सोडविणे, तसेच त्यांच्या तक्रारी तात्काळ निकाली काढणे आणि महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम व गतिमान करण्याच्या उद्देशाने राज्य शासनाने प्रत्येक जिल्ह्यातील तालुकास्तरावर मंडळ स्तरावर छत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबिर आयोजित करण्याचा निर्णय घेतला होता, त्यानुसार आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर





यांचे मार्गदर्शनाखाली शेंदुरजनाघाट येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान मोठया उत्साहात घेण्यात आले.

मागील कालावधीत महसूल विभागाच्या सेवा तळागाळातील लोकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचाव्यात यासाठी अनेक महत्त्वपूर्ण धोरणात्मक निर्णय घेण्यात आले आहेत. त्यामध्ये अकृषक रूपांतरासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक नसणे ,सनद प्रणाली रद्द करणे एक वेळ अधिमूल्य भरण्याची तरतूद तुकडेबंदी कायद्यात सुधारणा, अभिलेख अद्ययावतीकरण, वर्ग २ चे प्रकरण वर्ग १ मध्ये रुपांतर, 'जिवंत ७/१२' मोहीम, सामाजिक अर्थसहाय्य योजनांचे मंजुरी आदेश वितरण, तुकडे बंदीमुळे रद्द झालेल्या नोंदींचे पुनर्मंजुरीकरण, प्रलंबित फेरफार निकाली काढणे, अभिलेख दुरुस्ती, लोकसेवा हक्क कायद्यांतर्गत सेवा पुरवठा, पीएम किसान, ॲग्रोस्टेक इ. योजनांचा लाभ या सर्व सुधारणा ग्रामीण भागातील नागरिक, शेतकरी, महिला व विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचण्यासाठी जनजागृती करणे आवश्यक आहे,याच अनुषंगाने राजस्व मंडळ शेंदूरजनाघाट करीता महात्मा फुले सभागृह येथे छत्रपती शिवाजी महाराज महागराजस्व अभियान आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर होते.

शेंदूरजनाघाटच्या नगराध्यक्षा सुवर्णा वरखेडे तर तहसीलदार रामदास शेळके, पुरवठा निरिक्षक निखील नलावडे, तालुका कृषि अधिकारी रेहान मुजावार, नायब तहसिलदार पंकज चव्हाण यांचेसह अन्य मान्यवर उपस्थित होते.

वनपरीक्षेत्र विभाग, एकात्मिक बाल विकास प्रकल्प विभाग, आगार व्यवस्थापक विभाग, दुय्यम निबंधक विभाग, भारत ग्यास एजन्सी, आशा सेविका, विविध विभागांचे अधिकारी, ग्रामपंचायत प्रतिनिधी, सेतू केंद्र संचालक, आशा सेविका, पोलीस पाटील व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते. या अभियानांतर्गत एसटी सवलतीसाठी ५० पेक्षा अधिक लाभार्थ्यांनी लाभ घेतला, ७/१२ व ८ अ संदर्भातील ५३ प्रकरणे निकाली काढण्यात आली.

३५ फेरफार मंजूर, ११ अर्ज ७/१२ दुरुस्तीसाठी प्राप्त, १३५ प्रमाणपत्रांचे वितरण, विशेष म्हणजे जे विद्यार्थी प्राविण्य गुण घेवून १२ वी व १० वी शालांत परीक्षेमध्ये उतीर्ण झाले त्या सर्वांचे त्यांचे पालक सोबत व दीप भोंगाडे आणि नवनीत गाडगे हे महाराष्ट्र पोलीस दलामध्ये अथक परिश्रम घेऊन भरती झाले त्यांचा सुद्धा आमदार उमेश उर्फ चंदु यावलकर व इतर सर्व मान्यवांचे हस्ते प्रमाणपत्र देऊन सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करून करण्यात आली.

संचालन ग्राम महसुल अधिकारी राजेंद्र जंगले, प्रास्तविक तहसीलदार रामदास शेळके तर आभार चेतन चकूले यांनी मानले. मंडळ अधिकारी प्रमाणपत्र वितरण देवानंद मेश्राम यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वितेकरीता नितेश ठाकरे, ज्ञानेश्वर कवडे, कुणाल हरले यांनी परिश्रम घेतले.

## संपादकीय

**{ अडचणी जीवनाचा भाग आहेत, पण धैर्य विजयाचा मार्ग आहे. }**

### काटकसरीची सुरी: महागाई आणि बेरोजगारीच्या गर्तेत सामान्य माणूस!

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशातील जनतेला बदलत्या आर्थिक परिस्थितीची जाणीव करून देत 'काटकसरी'चे जे आवाहन केले आहे, त्याचे भारतीय जनमानसात आणि राजकीय, आर्थिक वतुर्ळात तीव्र पडसाद उमटत आहेत. कोणत्याही देशाच्या प्रमुखाने संकटसमयी किंवा आर्थिक शिस्तीचा भाग म्हणून जनतेला जपून वापर करण्याचा सल्ला देणे ही एक सामान्य प्रशासकीय बाब मानली जात असली, तरी भारतासारख्या प्रचंड लोकसंख्या आणि विषम अर्थव्यवस्था असलेल्या देशात या आवाहनाचे अर्थ अत्यंत गुंतागुंतीचे ठरतात. एका बाजूला देशाच्या परकीय चलन साठ्यावरील ताण कमी करणे आणि वित्तीय तूट नियंत्रणात आणणे हा यामागील शुद्ध आर्थिक हेतू असू शकतो; परंतु दुसऱ्या बाजूला सामान्य माणसाच्या दृष्टीने हे आवाहन म्हणजे सरकारी अपयशाची कबुली आणि भविष्यातील मोठ्या आर्थिक संकटाची नांदी वाटत आहे. विविध माध्यमांतून उमटणाऱ्या उलटसुलट प्रतिक्रिया हेच दर्शवतात की, काटकसरीचा हा मार्ग वरकरणी सोपा वाटत असला तरी तो भारतीय अर्थव्यवस्थेच्या चाकांना खीळ घालणारा ठरू शकतो. या आवाहनाचा सर्वात पहिला आणि मोठा फटका 'सोनं' आणि 'इंधन' या दोन अत्यंत संवेदनशील घटकांना बसताना दिसतो आहे. भारतीयांचे सोन्याशी असलेले नाते केवळ एक दागिना किंवा अलंकार म्हणून नाही, तर ती एक हक्काची आणि संकटकाळातील सर्वात मोठी आर्थिक सुरक्षा मानली जाते. भारतामध्ये बँकिंग व्यवस्थेपेक्षाही आजही सामान्य आणि ग्रामीण कुटुंबात सोन्यातील गुंतवणुकीला प्राधान्य दिले जाते. पंतप्रधानांच्या आवाहनानंतर जर जनतेने सोने खरेदीला पूर्णपणे फाटा दिला, तर त्याचा थेट परिणाम सराफा बाजारावर आणि पर्यायाने देशांतर्गत व्यापार उलाढालीवर होईल. सोन्याची आयात कमी झाल्यास देशाचे परकीय चलन नक्कीच वाचेल, हा सरकारचा तर्क असू शकतो. मात्र, यामुळे सराफा क्षेत्राशी जोडलेल्या लाखो कारागीर, छोटे व्यापारी आणि पतसंस्थांच्या व्यवसायाला मोठी खीळ बसेल. जेव्हा बाजारपेठेतील एका मोठ्या क्षेत्रातील उलाढाल थांबते, तेव्हा त्याचा साखळी परिणाम संपूर्ण अर्थव्यवस्थेवर होतो. दुसरा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे पेट्रोल आणि डिझेलचा वापर कमी करण्याचे आवाहन. इंधन हे आधुनिक अर्थव्यवस्थेचे रक्त मानले जाते. वाहतूक, उद्योग, शेती आणि दैनंदिन दळणवळण पूर्णपणे इंधनावर अवलंबून आहे. नागरिकांनी पेट्रोल-डिझेलचा वापर कमी करावा, असे म्हणणे जितके सोपे आहे, तितके ते प्रत्यक्ष व्यवहारात आणणे कठीण आहे. भारतातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था आजही प्रत्येक नागरिकाला गंतव्यस्थानी वेळेत पोहोचवण्यासाठी सक्षम नाही. अशा स्थितीत दुचाकी किंवा चारचाकी वाहनांचा वापर कमी करणे म्हणजे लोकांच्या कार्यक्षमतेवर मर्यादा आणण्यासारखे आहे. सर्वात चिंतेची बाब म्हणजे, इंधनाचा वापर कमी होणे याचा थेट अर्थ असा निघतो की, बाजारपेठेतील वस्तूंची वाहतूक आणि औद्योगिक उत्पादन संथ झाले आहे.

# 'लग्नाआधी आणि लग्नानंतर जोडीदाराला एकमेकांचे पासवर्ड माहित असावेत का?

'आजच्या डिजिटल युगात आपले संपूर्ण आयुष्य एका छोट्याशा स्मार्टफोनमध्ये सामावले आहे. आपले बँक डिटेल्स, सोशल मीडिया अकाऊंट्स, चॅट्स, व्यावसायिक गुपिते आणि वैयक्तिक विचार या सगळ्यावर 'पासवर्ड' नावाचे एक कवच असते. जेव्हा दोन व्यक्ती एकत्र येतात, मग ते लग्नाआधीचे प्रेमसंबंध असोत किंवा लग्नानंतरचे वैवाहिक आयुष्य, तेव्हा 'आपल्यात पारदर्शकता असावी' या नावाखाली अनेकदा एकमेकांचे पासवर्ड शेअर केले जातात. परंतु, एक मानसशास्त्रज्ञ आणि समुपदेशक म्हणून काम करताना येणाऱ्या जोडप्यांमध्ये या एका मुद्द्यावरून प्रचंड वाद, अविश्वास आणि मानसिक तणाव निर्माण होतात.

'जर आपल्यात प्रेम आहे, तर पासवर्ड लपवायचा कशाला?' इथपासून ते 'माझंही काही खाजगी आयुष्य आहे की नाही?' इथपर्यंतचे वाद कौटुंबिक न्यायालयांपर्यंत किंवा नाते तुटण्यापर्यंत पोहोचतात या लेखात आपण मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून समजून घेणार आहोत की, लग्नाआधी आणि लग्नानंतर जोडीदाराला एकमेकांचे पासवर्ड माहित असावेत की नाही, आणि याचे आपल्या मानसिक आरोग्यावर व नात्यावर काय परिणाम होतात.




**१. डिजिटल गोपनीयता म्हणजे काय आणि ती का महत्त्वाची आहे?**

मानसशास्त्राच्या नियमांनुसार, प्रत्येक मानवी मनाला स्वतःची एक 'वैयक्तिक जागा' आवश्यक असते. नाते कितीही घट्ट किंवा पवित्र असले तरीही, दोन व्यक्ती कधीही एक पूर्णतः एकजीव होऊ शकत नाहीत; त्या दोन स्वतंत्र व्यक्तीच राहतात

१. आत्मसन्मान आणि स्वातंत्र्य: एखाद्या व्यक्तीला त्याचा पासवर्ड स्वतःपाशी ठेवण्याचा अधिकार असणे म्हणजे त्याच्या स्वातंत्र्याचा आणि आत्मसन्मानाचा आदर करणे होय

२. फक्त जोडीदाराचा प्रश्न नसतो: जेव्हा तुम्ही तुमचा सोशल मीडिया किंवा ईमेलचा पासवर्ड जोडीदाराला देता, तेव्हा तुम्ही फक्त तुमची माहिती शेअर करत नाही, तर तुमच्याशी जोडलेल्या इतर व्यक्तींचीही माहिती उघडी करता. उदाहरणार्थ, एखाद्या मित्राने किंवा मैत्रिणीने विश्वासाने तुमच्याशी शेअर केलेली एखादी अत्यंत खाजगी गोष्ट तुमचा जोडीदार वाचू शकतो. ही त्या तिसऱ्या व्यक्तीच्या गोपनीयतेचा भंग ठरते

**२. लग्नाआधी: पासवर्ड शेअरिंग आणि मानसशास्त्र:–**

लग्नाआधीचा काळ हा एकमेकांना समजून घेण्याचा, विश्वास निर्माण करण्याचा काळ असतो. या काळात नाते अधिक नाजूक असते

अ. 'पासवर्ड मागणे' हे प्रेमाचे लक्षण की असुरक्षिततेचे? अनेकदा लग्नाआधी 'तू माझ्यावर किती प्रेम करतोस/करतेस?' हे सिद्ध करण्यासाठी पासवर्ड मागितला जातो. मानसशास्त्रानुसार, ही मागणी प्रेमातून नव्हे, तर

१. असुरक्षिततेच्या भावनेतून आणि नियंत्रण ठेवण्याच्या वृत्तीतून निर्माण होते. जर जोडीदाराला लग्नाआधीच तुमच्या प्रत्येक गोष्टीवर लक्ष ठेवायचे असेल, तर ते निरोगी नात्याचे लक्षण नाही

ब. संशयाची पाळेमुळे लग्नाआधी पासवर्ड माहीत असल्यामुळे सतत एकमेकांच्या ऑनलाईन ॲक्टिव्हिटीवर लक्ष ठेवले जाते. 'तो/ती कोणाशी चॅट करत आहे?', 'त्या पोस्टला कोणी लाईक केले?' यासारखे विचार व्यक्तीला मानसिकदृष्ट्या थकवून टाकतात. यामुळे नात्यात 'अति-विचार' आणि संशयाची भावना वाढीस लागते, जी पुढे जाऊन नाते जोडण्याऐवजी तोडण्यास कारणीभूत ठरते

**३. लग्नानंतर: नाते आणि पारदर्शकता**

**लग्नानंतर दोन व्यक्ती कायदेशीर आणि भावनिकदृष्ट्या एकत्र येतात.**

इथे जबाबदाऱ्या वाढतात आणि नात्याचे स्वरूप अधिक गंभीर होते. मग लग्नानंतर पासवर्ड शेअर करणे योग्य आहे का?

अ. 'पारदर्शकता' विरुद्ध 'अविश्वास' अनेकांचा असा गैरसमज असतो की, पासवर्ड माहीत नसणे म्हणजेच जोडीदार काहीतरी लपवत आहे. परंतु, मानसशास्त्रीय समुपदेशनात आम्ही नेहमी सांगतो:

१. 'पारदर्शकता ही वर्तनातून, बोलण्यातून आणि विश्वासातून दिसते, पासवर्ड शेअर केल्याने नाही.' जर जोडीदाराच्या मनात खरोखरच काही लपवायचे असेल, तर तो पासवर्ड देऊनही दुसरी गुपित अकाऊंट्स तयार करू शकतो. त्यामुळे पासवर्ड असणे ही प्रामाणिकपणाची हमी नाही

ब. मानसिक दमणूक आणि स्पेसची कमतरता लग्नानंतरही जेव्हा जोडीदार सतत एकमेकांचे फोन तपासतात, तेव्हा त्या नात्यातील 'गुदमरल्यासारखे' वाटू लागते. माणसाला स्वतःच्या भावना व्यक्त करण्यासाठी, किंवा कधीकधी फक्त स्वतःच्या विश्वात राहण्यासाठी एका सुरक्षित जागेची गरज असते. ती जागा हिरावून घेतली की व्यक्तीमध्ये चिडचिड, राग आणि नैराश्य येऊ शकते

**४. पासवर्ड शेअर करण्याचे मानसशास्त्रीय तोटे पासवर्ड शेअर केल्यामुळे निर्माण झालेल्या खालील समस्या प्रामुख्याने समोर येतात:**

१.सूक्ष्म-व्यवस्थापन : जोडीदार तुमच्या प्रत्येक लहान-सहान गोष्टीचे विश्लेषण करू लागतो. 'तू त्या व्यक्तीला असा मेसेज का केलास?' किंवा 'तुला तिचा फोन का आला होता?' या प्रश्नांमुळे नात्यातील सहजता संपून जाते

१. गैरसमज लेखी संभाषणात भावना दिसत नाहीत. तुम्ही एखाद्या जुन्या मित्राशी केलेल्या मस्करीचा जोडीदार चुकीचा अर्थ काढू शकतो, ज्यामुळे विनाकारण मोठे वाद निर्माण होतात

२. इमोशनल ब्लॅकमेलिंग: दुर्दैवाने, जर नात्यात कटुता आली किंवा घटस्फोटाची वेळ आली, तर आधी शेअर केलेल्या पासवर्डचा वापर एकमेकांना बदनाम करण्यासाठी, चॅट्सचे स्क्रीनशॉट्स व्हायरल करण्यासाठी किंवा कायदेशीर लढाईत अस्त्र म्हणून केला जातो

**५. काही अपवादात्मक आणि व्यावहारिक परिस्थिती:–**

मानसशास्त्र जरी वैयक्तिक स्वातंत्र्याचा पुरस्कार करत असले, तरी व्यावहारिक जगतात काही अपवाद पाळणे गरजेचे ठरते: 'परिस्थिती –पासवर्ड माहीत असणे गरजेचे आहे का? मानसशास्त्रीय कारण १. बँक आणि आर्थिक व्यवहार – होय (मर्यादित) कौटुंबिक सुरक्षिततेसाठी आणि आणीबाणीच्या प्रसंगात आर्थिक खात्यांचे पासवर्ड किंवा नॉमिनीची माहिती जोडीदाराला असणे अत्यंत गरजेचे आहे सोशल मीडिया– नाही हे वैयक्तिक अभिव्यक्तीचे माध्यम आहे. इथे प्रत्येकाला आपली स्पेस मिळायला हवी फोनचा मुख्य लॉक– होय / नाही (परस्पर संमतीने) फोनचा लॉक माहीत असण्यात गैर नाही, पण तो जोडीदाराच्या अनुपस्थितीत गुपचूप तपासण्यासाठी वापरला जाऊ नये

**६. समुपदेशकाचा सल्ला: एक सुवर्णमध्य**

जर तुम्ही या समस्येचा सामना करत असाल, तर एक समुपदेशक म्हणून मी तुम्हाला काही महत्त्वाचे नियम आणि सुवर्णमध्य सुचवू इच्छितो:

१. डिजिटल सीमारेषा ठरवा नात्याच्या सुरुवातीलाच किंवा लग्नानंतरही शांतपणे बसून या विषयावर चर्चा करा एकमेकांना सांगा की, 'माझा तुझ्यावर पूर्ण विश्वास आहे, आणि मला आशा आहे की तुझाही माझ्यावर असेल. पासवर्ड हा विश्वासाचा मापदंड असू शकत नाही'

२. डिजिटल डिटॉक्स आणि विश्वासाची व्याख्या बदला जोडीदाराचा फोन तपासण्याची इच्छा होणे ही मनातल्या असुरक्षिततेची भावना दर्शवते. जेव्हा अशी इच्छा होईल, तेव्हा स्वतःला विचारा की, मला नक्की कशाची भीती वाटतेय? जोडीदाराशी थेट आणि मोकळेपणाने संवाद साधा. संशय हा संवादाने मिटतो, हेरगिरीने नाही

३. आणीबाणीसाठी पर्याय जर सुरक्षेचा किंवा इमर्जन्सीचा प्रश्न असेल, तर तुम्ही तुमचे महत्त्वाचे पासवर्ड एका डायरीत लिहून घरात एका सुरक्षित ठिकाणी ठेवू शकता, जेणेकरून संकटसमयी जोडीदाराला त्याचा वापर करता येईल. परंतु, रोजच्या आयुष्यात एकमेकांच्या खात्यांवर पाळत ठेवणे पूर्णपणे टाळावे शेवटी, नाते हे डिजिटल कोड किंवा पासवर्डवर चालत नाही, तर ते विश्वास, आदर आणि समजूतदारपणा या तीन स्तंभांवर उभे असते लग्नाआधी असो वा लग्नानंतर, जोडीदाराला एकमेकांचे पासवर्ड माहीत असावेत की नाही, याचे उत्तर 'नाही' असेच असावे, जोपर्यंत एखादी आणीबाणीची परिस्थिती नसेल. जोडीदाराला पासवर्ड न देणे म्हणजे काहीतरी लपवणे नव्हे, तर आपल्या नात्यात एकमेकांच्या अस्तित्वाचा आणि स्वातंत्र्याचा आदर करणे होय एकमेकांचे फोन अनलॉक करण्यापेक्षा, एकमेकांच्या मनातील भावना अनलॉक करण्यावर भर द्या. नात्यात जितकी मोकळी हवा असेल, तितकेच ते नाते दीर्घकाळ सुदृढ आणि आनंदी राहील.

# वर्धा नदीवरील दगडी पुलाचा इतिहास

भारतात इंग्रज राजवट होती त्यावेळी दळणवळणासाठी त्यानी अनेक सुधारणा घडवून आणल्या पोलिस स्टेशन, रेल्वे स्टेशन दवाखाना, विहीर,शाळा, मुसाफिरखाना दगडीपुल अनेक इंग्रजकालीन वास्तु चांगल्या स्थितीत उभ्या आहेत. वर्धा अमरावतीला या जिल्ह्याना जोडणारया नदीवरील पुलाचा इतिहास पाहणार आहोत.

आपण सर्व प्रवास कक्षतानी हजार वेळा पुलावरून प्रवास केला आहे पण आज याच जन्मइतिहास पाहणार आहो फोटोतील इंग्रजकालीन दगडीपुल वर्धा नदीवरचा आहे जिल्हाचे दोन भाग करणार्या पुला कहाणी आपण वाचायला पाहिजे म्हणून पोस्ट लिहिली आहे अमरावती जिल्ह्यातील शेवटचं गाव भारवाडी पार केले कि वरदा नदीचे पात्र दिसते.

अमवराती वर्धा दोन जिल्हात विभागनी करणार्या नदीचे खरे नाव वरदा आहे. पण वर्धा नदी उच्चारतो अगदी सुरुवातीच्या काळात वरदा नदीवर मातीदगडाचा बंधारा होता. त्यांवरून पायदळ, बैलजोडीची वहिवाट व्हायची.

परंतु पुरामुळे पावसाळ्यात गावातील संपर्क तुटायला यासाठी डोंग्याची सोय होती पण उफनत्या नदीतुन प्रवास भितीदायक होता.भोई डोंगा टाकतं नव्हते.

डोंगा वाहुन जावू नये म्हणून काठावर बांधणीत ठेवायचे वरदा नदीचा प्रवाह आजही तितकाच धोकादायक आहे आज पर्यंत पुराच्या पाण्यात कितीतरी लोकांना जलसमाधी मिळाली परतोडा गांवचा व्यापारी बैलबंडी सोबत वाहून गेला दलपतपुरची लग्न वरात भांडयाकुडया सोबत डुबली अश्या अनेक दुःखद घटना घडल्या त्याची नौंद नाही. मग इंग्रज सरकारने वाहतुकीच्या दृष्टीने पुल बांधण्याची योजना आखली या करिता.

जॉर्ज फॅब्रिक या इंजिनिअरची निवड करण्यात आली. यांच्या टिमला वर्धवरुन मातीपरिक्षण करिता बोलविण्यात आले. हि पाहणी नदीचे पात्र कोरड असताना झाली होती. तेव्हा पुलावर मजुरी करणारे चंपतराव गाडगे यांनी मला





सांगितले त्यानंतर १९१४ मध्ये पुल बांधकामाला सुरुवात झाली इंग्रजांनी बाहेरून मजूर आणले नाही फक्त मिस्त्री आणि इंजिनिअर आणले.खेड्या पाड्यातील तरुणांना पोलिस पाटल कोतवाल यांनी दोंवडी देवून एकत्र केले होते. हि दोन्ही बिष्णुर गावात पण झाली होती.

पुल कामासाठी प्रत्येक गावातील बाया माणस मोल मजुरीला लागले जो तरुण फक्त दगड मातीच काम करायचा त्याला एक रुपया. ज्याच्या जवळ बैलबंडी आहे त्याला दीड रुपया मजुरी होती. दुपारी पाण्यात फुगलेला चने इंग्रजांकडून नियमित मिळायचे. इंग्रज अधिकारी फक्त घोड्यावरुन येवून पुलाची पाहणी करायचे तर मोठे अधिकारी मेन्यातुन फेरी मारायचे-- गाव कोतवाल पोलिस पाटीलावर गावमजुर आणण्याचा जुम्मा होता.

भारसोडा भारसवाडी विष्णूर परतोडा, खडका, खडकी वरखेड, तारखेड, जळगाव जुनीभरवाडी,चिस्तुर, तळेगाव,आष्टी अश्या अनेक गावातील तरुण बाया माणसाना काम मिळाले बांधकामाला सुरुवात झाली.

पुलासाठीचा दगड वरदा नदीच्या पात्रातुनच काढण्यात आला. दगड फोडून आकार देण्यासाठी कारागीर मंडळी नदीकाठी पाल टाकून राहायची-बारा बैलघाने चूनखडी, शिसम, जवसतेल, डिंग, उळीददाळ, झाडांची साल, घालून चक्री मसाला तयार करायचे. त्यापासूनच पुलाची जुडाई करण्यात आली. हा पुलाचे बांधकाम वर्धा जिल्ह्याकडुन अमरावतीकडे सुरू झाले शेवटी दगड कमी पडला म्हणून भारसोडा भागातील नदी खोदुन दगड काढण्यात आले. या बारुदाचा वापर करण्यात आला होता दगड आणण्यासाठी अनेक बैल बंड्या कामी लागल्या त्यामध्ये भिष्णुर गावरचे चंपतराव यशवंत गाडगे यांची बैलबंडी होती. बांधकामासाठी मोठमोठे दगड काढण्यात आल्याने तिथे मोठा खड्डा झाला. आता त्याला वरदा नदीचा डोह म्हणतात दगड तराशीचे काम तब्बल दोन वर्षे चालले. २५ खड्डे करायला एक दिड वर्षाचा करण्यासाठी कालावधी लागला. पावसाळा लागला कि चार महिने काम बंद राहायच.पण दगडाचे कोरीवकाम सुरू असायचे. पूल बांधतेवेळी २५ खड्डे खोदण्यात आले. सारख्या अंतरावर २५ खड्डे खोदून पुलाचा पाया तयार करण्यात आला-- जुन्या पुलावर जाऊन पहा पंचवीस कमानी दिसतात बाराव्या कमानीवर दगडी एक शिलालेख आहे. त्यावर बांधकाम वर्ष इंजिनियरचे नाव ऐकुन खर्च लिहिलेला आहे. परंतु पुलाला एकुण किती खर्च लागला हे स्पष्ट दिसत नाही.

काही लोकांनी त्या दगड खरपावर कुऱ्हाडीला धार लावली मजकूर नष्ट केला पूल बांधायला एकूण साडेचार ते पाच वर्षाचा कालावधी लागला. पुलावर मजुरीचे काम करणाऱ्या तीन लोकांची मी १९९० मध्ये भेट घेतली होती. त्यापैकी चंपतराव यशवंत गाडगे भिष्णुर यांची भेट घेतली-- त्यानीच हि माहिती दिली. चंपतराव यशवंत गाडगे भिष्णुर वरून बैलबंडी आणुन चार वर्ष पुलाचे काम केले.आता घडीला पुलाचे आयुष्य ११० वर्षाचे आहे तरी पुराचा सपाटा सहन करतो.१९१७ मध्ये इंग्रजानी बनविलेला पुल आजही चांगल्या स्थितीत आहे आपण फोटोत चित्र पाहत आहोत-- ना खालुन पुराचे पाणी वाहत आहे १९१७ ते २०२६ म्हणजे ११० वर्ष होवूनही पुल मजबूत आहे. १९९० पासून पुलावरून वाहतूक बंद करण्यात आली १९८९-९० साली पहिला मोठा पूल अगदी बाजूला बांधण्यात आला त्यानंतर २००४-५ मध्ये पुन्हा दुसरा पूल बांधण्यात आला अशाप्रकारे वर्धा नदीवर आता तीन पुल आहेत.ह्या पुलाचे बांधकाम झाल्यानंतर तिवसा रेस्टहाऊस, पोलीस स्टेशन, मुसाफिरखाना प्रायमरीशाळा आणि पिंगळा नदिवरील पुलाचे बांधकाम झाले. आता तिवसा शहरा मध्ये इंग्रजकालीन फक्त चार वास्तु उभ्या आहेत पोलिस स्टेशन, रेस्टहाऊस, पिंगळा नदीचा पूल जिल्हा परिषद प्राथमिक शाळा- ग्रामीण रुग्णालया जवळ असलेला मुसाफिरखाना-- रोड रुंदीकरणाच्या वेळी १९८० मध्ये पाडण्यात आला.

**रवी दलाल**

वरुड दर्पण हे पत्र संपादक, प्रकाशक, मालक चंद्रकांत भाऊरावजी भड यांनी माऊली मुद्राटेक, मुद्रक - चंद्रकांत भा.भड, जिजाऊ नगर, बस स्टॅन्ड रोड, वरुड जि.अमरावती येथे छापून वरुड दर्पण कार्यालय, जिजाऊ नगर, बसस्टॅन्ड रोड, वरुड, ता.वरुड, जि.अमरावती येथुन प्रकाशित केले. (सर्व वाद वरुड न्यायालयाअंतर्गत सोडविले जातील.) मोबा.९४२२१५७७१२, ७७४५०६७७१२

# सेंट्रल बँक ऑफ इंडियाच्या मेगा एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रमात 30 कोटींचे कर्जवाटप

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**अमरावती** – सेंट्रल बँक इंडियाच्या वतीने एमएसएमई क्रेडिट आउटरीच कार्यक्रम शनिवार, दि.१६ मे रोजी परतवाडा येथील कंचन टॉवर आणि अमरावती येथील पुंडलिक लॉन येथे पार पडला. यात ३० कोटींचे कर्जवाटप करण्यात आले. परतवाडा येथील कार्यक्रम ग्राहक उत्पादन वितरण असोसिएशनचे अध्यक्ष पंकज गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली पार पडला. अमरावती येथील कार्यक्रमाला सीए असोसिएशनचे उपाध्यक्ष सीए संदीप सुराणा उपस्थित होते. दोन्ही कार्यक्रमाला सेंट्रल बँकेच्या हेड ऑफिसचे जनरल मॅनेजर प्रीति सारस्वत उपस्थित होत्या. त्यांनी उपस्थितांना सेंट्रल बँकेच्या कमी व्याज दरावर उपलब्ध असलेल्या कर्जाचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. दोन्ही कॅम्पमध्ये ३० कोटी रुपयाचे कर्ज वाटप करण्यात आले. अमरावती क्षेत्रिय प्रमुख सुनील पाण्डेय यांनी प्रास्ताविकातून विविध योजनाची माहिती दिली. श्रीकांत पड़वाड़ यांनी सूत्रसंचालन केले. अग्रणी जिल्हा व्यवस्थापक नरेश हेड़ाऊ यांनी आभार मानले.

# जिल्हा परिषद अमरावती अंतर्गत विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा

## विकास योजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश

(प्रतिनीधी वरूड दर्पण)



**अमरावती** – चंद्रशेखर बावनकुळे महसूल मंत्री महाराष्ट्र राज्य तथा पालकमंत्री अमरावती यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा परिषद अमरावती येथे डॉ.पंजाबराव देशमुख सभागृहात विविध विभागांच्या कामकाजाचा सविस्तर आढावा घेण्यासाठी बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी विभागीय आयुक्त नयना गुंडे, आमदार प्रवीण तायडे, प्रताप अडसड, संजय खोडके, राजेश वानखडे, केवलराम काळे, उमेश उर्फ चंदू यावलकर, रवी राणा, महापौर श्रीचंद तेजवानी, जिल्हाधिकारी आशिष येरेकर, मुख्य कार्यकारी अधिकारी सत्यम गांधी, महानगर पालिका आयुक्त वर्षा लड्डा उपस्थित होते.

बैठकीदरम्यान जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांच्या अंमलबजावणीचा, विकासकामांच्या प्रगतीचा, प्रलंबित विषयांचा तसेच आगामी नियोजनाचा सविस्तर आढावा घेण्यात आला. संबंधित विभागांना कामकाज अधिक प्रभावी, गतिमान व लोकाभिमुख पद्धतीने राबविण्याचे स्पष्ट निर्देश पालकमंत्री महोदय यांनी दिलेत

बैठकीत पाणी पुरवठा, स्वच्छ भारत मिशन, शिक्षण, आरोग्य, महिला व बालविकास, कृषी, लघु सिंचन, ग्रामपंचायत, बांधकाम तसेच सामान्य प्रशासन विभागांच्या कामांचा सखोल आढावा घेण्यात आला. जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी सर्व विभागांनी परस्पर समन्वय साधून काम करावे आणि शासनाच्या योजनांची प्रभावी व परिणामकारक अंमलबजावणी सुनिश्चित करावी, असे निर्देश पालकमंत्र्यांनी दिले.

उमेद अभियान अंतर्गत उत्कृष्ट कार्य करणाऱ्या बचत गटांना बळकटी देण्यासाठी प्रत्येकी एक लाख रुपयांचे फिरते भांडवल उपलब्ध करून देण्यात येईल. स्वच्छ भारत मिशन मध्ये पाच हजारांपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या गावांसह आसपासच्या गावांचा क्लस्टर तयार करून घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प उभा करावा आणी प्रकल्पांतर्गत सेंद्रिय खत निर्मिती करून ते स्थानिक शेतकऱ्यांना उपलब्ध करून देण्याच्या सूचना दिल्यात.

कृषी विभागाने भरारी पथक स्थापन करून कार्यान्वित करावे, महिला व बालविकास विभागाला पुढील तीन वर्षांचा आराखडा तयार करून नागपूर मॉडेलच्या धर्तीवर अंगणवाडी केंद्रांचे उन्नतीकरण करण्याचे निर्देश बैठकीत देण्यात आले.

लघु सिंचन विभागाने जिल्ह्यात जलसंधारणाची कामे मोठ्या प्रमाणावर हाती घ्यावीत. पाणीस्रोतांचे सर्वेक्षण करून मृत बंधारे पुनर्जीवित करावे, गॅबियन बंधारे तयार करावे आणी सि एस आर निधी उपलब्ध करण्यासाठी जिल्हा प्रशासनाने एकत्रित नियोजन करण्याच्या सूचनाही देण्यात आल्या. तर ग्रामपंचायत विभागाला टप्प्याटप्प्याने स्मशानभूमी विकासाची कामे पूर्ण करण्यास सांगण्यात आले.

सामान्य प्रशासन विभागाच्या आढाव्यात जिल्ह्यातील गट विकास अधिकाऱ्यांची रिक्त पदे तातडीने भरण्याची कार्यवाही करण्यात येईल, असे पालकमंत्री महोदय म्हणालेत. आरोग्य विभागाला नागपूर मॉडेलप्रमाणे 'मॉडेल प्राथमिक आरोग्य केंद्र' विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. तसेच सर्व विभागांच्या समन्वयातून जिल्ह्यात २५ आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्याबाबतही सूचना करण्यात आल्या.

शिक्षण विभागाने पुढील तीन वर्षांचा आराखडा तयार करून जास्त पटसंख्या असलेल्या शाळांमध्ये डिजिटल शाळा विकसित करण्याचे निर्देश देण्यात आले. आर्थिकदृष्ट्या दुर्बल व दूरवरून शाळेत येणाऱ्या पाच हजार विद्यार्थ्यांना सायकल उपलब्ध करून देण्याचाही निर्णय यावेळी घेण्यात आला.

# उभ्या जेसीबीने अचानक घेतला पेट

(प्रतिनिधी वरूड दर्पण)

## शेंदूरजनाघाट-मलकापूर परिसरात खळबळ



**वरूड** – मलकापूर मार्गावरील मलकापूर कॅनलच्या सुरू असलेल्या कामाजवळ उभी असलेली जेसीबी मशीन अचानक पेटल्याने परिसरात एकच खळबळ उडाली. ही घटना जैयस्वाल पेट्रोल पंपाच्या मागील बाजूस घडली असून, काही क्षणातच आगीने जेसीबीला वेढा घातला. सुदैवाने वेळीच नागरिकांनी व कामगारांनी धाव घेतल्याने मोठा अनर्थ टळला.

मिळालेल्या माहितीनुसार, मलकापूर कॅनलचे काम सुरू असताना संबंधित जेसीबी उभी करण्यात आली होती. अचानक मशीनमधून धूर निघू लागला आणि काही क्षणातच आग भडकली. आग लागल्याचे लक्षात येताच परिसरातील नागरिक व कामगारांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत आग आटोक्यात आणण्याचा प्रयत्न केला.

घटनास्थळ पेट्रोल पंपालगत असल्याने काही काळ भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. आग अधिक भडकली असती तर मोठी दुर्घटना घडण्याची शक्यता नाकारता येत नव्हती. मात्र सतर्कतेमुळे संभाव्य अनर्थ टळल्याने नागरिकांनी सुटकेचा निश्वास सोडला. सदर जेसीबी ही पुसला येथील केदार यांची असल्याची माहिती समोर आली आहे. आगीमागचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झाले नसले तरी शॉर्टसर्किट अथवा तांत्रिक बिघाडामुळे आग लागल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त केला जात आहे. घटनेमुळे परिसरात काही काळ मोठी गर्दी जमली होती.

या घटनेनंतर बांधकाम ठिकाणी उभ्या यंत्रसामग्रीची नियमित तपासणी व अग्निसुरक्षा उपायांची अंमलबजावणी करण्याची मागणी नागरिकांकडून करण्यात येत आहे.

# 'सृजन' शिबिरामुळे मुलांमध्ये आमूलाग्र बदल : पालकांमध्ये समाधानाचे वातावरण!

(प्रतिनीधी वरूड दर्पण)

## माणिकधारा संस्थेचा स्तुत्य उपक्रम: मोबाईलची जागा घेतली पुस्तकांनी, चिडचिडेपणा झाला दूर



**आष्टी** – 'माझा मुलगा खूप चिडायचा, आता तो शांत राहायला शिकला आहे.', 'मुलगी तासनब तास मोबाईल बघायची, ती आता स्वतःहून गोष्टींचे पुस्तक वाचायला बसते.' यांसारख्या अत्यंत सकारात्मक आणि समाधानकारक प्रतिक्रिया 'सृजन' बालसंस्कार शिबिरात सहभागी झालेल्या मुलांच्या पालकांनी व्यक्त केल्या.

आष्टी (शहीद) येथील माणिकधारा बहुउद्देशीय संस्थेने ५ मे ते १५ मे या कालावधीत ७ ते १३ वयोगटातील मुलांसाठी या विशेष शिबिराचे आयोजन केले होते. आष्टी, परसोडा आणि लहान आर्वी गावातील बालकांनी यात उत्स्फूर्त सहभाग घेतला.

'आजची पेरणी, भविष्याची उभारणी' 'मनाचे आरोग्य' आणि 'मेंदूचे प्रशिक्षण' हा पाया ठेवून मानसशास्त्राच्या दृष्टिकोनातून मुलांच्या विचार, भावना, सवयी व वर्तन विकासावर या शिबिरात विशेष भर देण्यात आला. केवळ १० दिवसांपुरते मर्यादित न राहता, ही मुले वर्षभर संस्थेसोबत विविध उपक्रमांद्वारे जोडलेली राहणार असून त्यांच्या सातत्यपूर्ण विकासावर काम केले जाईल, हे या उपक्रमाचे मुख्य वैशिष्ट्य आहे.

शिबिराची प्रमुख वैशिष्ट्ये आणि वेगळेपण: वैचारिक जडणघडण: मानसशास्त्रीय सिद्धांतानुसार मुलांच्या विचार, भावना आणि वर्तनाची योग्य जडणघडण करण्यात आली.

वाचन आणि मंथन: प्रसिद्ध समुपदेशक व लेखिका डॉ.श्रुती पानसे यांच्या लेखांचे रोज वाचन आणि त्यावर चर्चा घडवून आणली गेली. तज्ज्ञांचे थेट मार्गदर्शन: शिबिराच्या शेवटी डॉ.श्रुती पानसे यांनी ऑनलाईन माध्यमातून सलग दीड तास मुलांशी संवाद साधून त्यांच्या प्रश्नांची उत्तरे दिली.

मान्यवरांची उपस्थिती आणि परिश्रम समारोपीय कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गुरुदेव उपासक वसंतराव ढवळे होते. प्रमुख पाहुणे म्हणून 'उमेद'चे तालुका व्यवस्थापक संदीप कांबळे, सामाजिक कार्यकर्त्या नंदिनी कांदे, माया सावरकर आणि सविता कोकाटे उपस्थित होत्या. माणिकधारा संस्थेच्या अध्यक्षा व समुपदेशक प्रतिक्षा दापूरकर यांनी मुलांना बौद्धिक व तार्किक मार्गदर्शन केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी मनिष उमरकर, प्रतिक दापूरकर, शोयब काझी, प्रांजली आत्राम यांनी विशेष परिश्रम घेतले, तर आभार प्रदर्शन मीनाक्षी शहाणे यांनी केले.

थोडक्यात पण महत्त्वाचे: हे शिबिर केवळ संस्कार वर्ग न ठरता मुलांच्या मानसिक आणि वर्तणुकीच्या बदलासाठी एक प्रभावी माध्यम ठरले आहे, ज्याची प्रचिती पालकांच्या चेहऱ्यावरील समाधानातून दिसून आली.

# पालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांना जनगणनेचे काम : म्युनिसिपल मजदूर युनियनचा तीव्र विरोध

(प्रतिनीधी वरूड दर्पण)




**मुंबई** – मुंबई महापालिकेतील चतुर्थ श्रेणी कामगारांना त्यांच्या नियमित कामासोबत जनगणनेच्या कामासाठी पाठवण्यात येत असल्याने कामगारांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून या निर्णयाला म्युनिसिपल मजदूर युनियनने कडाडून विरोध केला आहे. नियमित कामानंतर त्यांना जनगणनेचे काम देऊ नये, असे युनियनचे अध्यक्ष अशोक जाधव यांनी म्हटले आहे. सध्या मुंबईत जनगणनेच्या नोंदणीचे काम मोठ्या प्रमाणावर सुरू असून, देशहिताचे हे काम असल्याची जाणीव संघटनेलाही आहे. मात्र, ऐन कडक उन्हाळ्यात महापालिकेतील चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांकडून नियमित काम करून घेतल्यानंतर त्यांना जनगणनेच्या कामासाठी पाठविले जात असल्याने कामगार त्रस्त झाले आहेत, असे जाधव यांनी म्हटले आहे. बहुसंख्य चतुर्थश्रेणी कामगार हे अल्पशिक्षित असून अनेकांकडे स्मार्टफोनही नाहीत. काही कर्मचारी केवळ साध्या की-पॅड फोनचा वापर करतात. त्यामुळे नागरिकांची माहिती ऑनलाइन नोंदवणे, ती वरिष्ठांकडे पाठवणे यामध्ये अडचणी निर्माण होत आहेत.

# पावसाळी हंगामात मांडवा-गेटवे जलवाहतूक बंद : २६ मेपासून सेवा स्थगित

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

**अलिबाग** – पावसाळी हंगाम आणि संभाव्य खराब हवामानाच्या पार्श्वभूमीवर मांडवा जेट्टी ते गेटवे ऑफ इंडिया दरम्यान सुरू असलेली प्रवासी जलवाहतूक सेवा मंगळवार, दि. २६ मेपासून तात्पुरती बंद करण्यात येणार आहे. ही सेवा ३१ ऑगस्टपर्यंत बंद राहणार असल्याची माहिती महाराष्ट्र सागरी मंडळ यांच्या मांडवा बंदर कार्यालयाकडून देण्यात आली आहे. पावसाळ्यात समुद्र खवळलेला असण्याची शक्यता लक्षात घेता प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने हा निर्णय घेण्यात आला आहे. महाराष्ट्र सागरी मंडळ अंतर्गत मांडवा बंदर निरीक्षक कार्यालयाने यासंदर्भातील अधिकृत आदेश जारी केले असून अंतर्गत जलवाहतुकीवर निर्बंध लागू करण्यात आले आहेत.


**नोकरी**

मिहान, ऑफीस, बॅंकींग, अर्धसरकारी प्रोजेक्ट साठी प्रत्येक जिल्हयात भरती. ऑपरेटर, सुपरवायजर, गार्ड, वर्कर, मॅनेजर

वय – १८ ते ३५

पगार – १५,००० ते ३५,००० कमवा

पुजा मॅडम ७७९६३८७१५६ ७८८८०६९४५५

**पाहिजेत**

वरुड, मोर्शी आणि चांदुर बाजार येथे एका शो-रुम करीता आकर्षक वेतन, इन्सेंटिव्ह आणि पेट्रोल अलाऊंस सह सेल्स एक्झिकेटिव्ह पाहीजे आहे, इच्छुकांनी तातडीने संपर्क साधावा.

| अ.क्र | पदाचे नांव | शैक्षणिक | पदांची संख्या |
|---|---|---|---|
| १ | सेल्स एक्झिकेटिव्ह | पात्रता इयत्ता १२ वी पास | १० |

– संपर्क –

प्रसन्न ट्रॅक्टर्स


रिलायन्स पेट्रोल पंप जवळ, अमरावती रोड वरुड, जि.अमरावती

मोबा.९४२२१५५३४३

# नसरापूर प्रकरणी ११०० पानांचे आरोपपत्र दाखल

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

**पुणे –** पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यातील नसरापूर येथे घडलेल्या अत्यंत संतापजनक बालिका अत्याचार व खून प्रकरणात पुणे ग्रामीण पोलिसांनी ११०० पानांचे सविस्तर आरोपपत्र विशेष न्यायालयात दाखल केले आहे. या प्रकरणातील आरोपी भीमराव कांबळे याच्याविरोधात अवघ्या १५ दिवसांत तपास पूर्ण करून हे आरोपपत्र सादर करण्यात आले आहे. या गुन्ह्यामुळे संपूर्ण राज्य हादरले होते. पुणे ग्रामीण पोलीस अधीक्षक संदीपसिंह गिल यांच्या



मार्गदर्शनाखाली तपास पूर्ण करण्यात आला असून त्यांनी दिलेल्या आश्वासनानुसार जलदगतीने न्यायालयात आरोपपत्र दाखल करण्यात आले. या प्रकरणात विशेष सरकारी वकील अजय मिसार आणि तपास अधिकारी निरीक्षक विजयमाला पवार यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. गुन्ह्याचा तपास करताना ५० हून अधिक साक्षीदारांचे जबाब, सीसीटीव्ही फुटेज, डीएनए चाचणी, वैद्यकीय अहवाल आणि न्यायवैद्यक पुरावे न्यायालयात सादर करण्यात आले आहेत. नसरापूर येथे १ मे रोजी घडलेल्या या घटनेत साडेतीन वर्षांच्या बालिकेवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आला होता.

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३३५/२०२६** **ने.ता.१८/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) श्रीमती कौसल्या भाऊराव माळोदे, वय अं.८० वर्ष, धंदा–घरकाम, २) श्री.बाबाराव भाऊराव माळोदे, वय अं.५० वर्ष, धंदा– शेती, ३) श्रीमती अर्चना गोपालराव माळोदे, वय अं.४५ वर्ष, धंदा– घरकाम, ४) करण गोपालराव माळोदे, वय अं.२१ वर्ष, धंदा– शिक्षण, अर्जदार क्र.१ ते ४ रा.टेंभूरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे भाऊराव बकाराम माळोदे, रा.टेंभूरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.१८/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल. आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्रीमती.जे.एस.ठाकरे, दुसरे सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३७५/२०२६** **ने.ता.११/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) रुख्माबाई प्रल्हादराव मानकर, वय अं.६५ वर्ष, धंदा–घरकाम, २) विजय प्रल्हादराव मानकर, वय अं.४६ वर्ष, धंदा–मजुरी, ३) महेश प्रल्हादराव मानकर, वय अं.३६ वर्ष, धंदा–मजुरी, ४) सिमा कृष्णराव वानखडे, वय अं.४० वर्ष, धंदा–मजुरी, ५) प्रेमा अनिल खेरडे, वय अं.३८ वर्ष, धंदा– घरकाम, अर्जदार क्र.१ ते ४ रा.वरुड, क्र.५ रा.पिंपळखुटा मोठा ता.मोर्शी

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मय्यत नामे प्रल्हाद महादेवराव मानकर, रा.वरुड, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात क्लॉज २ बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.११/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४४९/२०२६** **ने.ता.०८/०७/२०२६**

**अर्जदार :-** १) सुखदेव बाबुराव कोहळे, वय अं.६५ वर्ष, धंदा–सेवानिवृत्त, २) अरुण बाबुराव कोहळे, वय अं.६१ वर्ष, धंदा– शेती, ३) मोनिका नरेंद्र तायडे, वय अं.३३ वर्ष, धंदा–नोकरी, ४) श्रुतीका नरेंद्र तायडे, वय अं.३१ वर्ष, धंदा–घरकाम, अर्जदार क्र.१ रा.औरंगाबाद, ता.जि.औरंगाबाद, क्र.२ रा.पवनी सक्राजी, ता.वरुड, क्र.३ व ४ रा.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **कोणी नाही**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत भाऊराव मारोती राजुरकर, रा.खापरखेडा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी **दि.०८/०७/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख **०८/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.आय.जे.ठाकरे, दिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.४०९/२०२६** **ने.ता.१८/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) प्रभूदास विठ्ठलराव वानखेडे, वय अं.४५ वर्ष, धंदा–मजुरी, रा.बलकदास सोनपिपले, पलंदुरकर सोसायटी, दाभा, २) आशा प्रभाकर पाचपोर, वय अं.६५ वर्ष, धंदा–घरकाम, रा.ताज आनंद आश्रम जवळ, वार्ड नं.२ खापरखेडा, नागपूर, ३) शारदा ज्ञानेश्वर इखे, वय अं.६० वर्ष, धंदा–घरकाम, रा.१८८, माना हायस्कूल जवळ, पार्वती नगर, तपोवन अमरावती, ४) सपना राजेंद्र बोहरूपी, वय अं.४० वर्ष, धंदा– घरकाम, रा.प्लॉट नं.१९, पलंदुर ले आउट, टेकडी, दत्त वाडी, नागपूर, ५) सखूबाई विठ्ठलराव वानखेडे, वय अं.७० वर्ष, धंदा– घरकाम, रा.बलकदास सोनपिपले, पलंदुरकर सोसायटी, दाभा, नागपूर

**... विरुध्द ...** **गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी **मयत विठ्ठल सिताराम वानखेडे, रा.सावंगा, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१८/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख /०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

# आस्थापनांवर मराठी पाट्या झळकल्या : विधी समिती अध्यक्षांचा दणका

*(प्रतिनीधी वरुड दर्पण)*

***मुंबई*** – मराठी पाट्या लावणे बंधनकारक असताना वारंवार सांगूनही दुर्लक्ष करणे मुंबईतील अस्थापनाच्या अंगलट आले. विधी समिती अध्यक्षा दीक्षा कारकर यांनी ग्राऊंड झिरोवर धाडसत्र सुरु करत ज्या आस्थापनांवर मराठी पाट्या नाही त्यांना ऑन दी स्पॉट नोटीस बजावण्यास सुरुवात केली. कारवाईचा बडगा उगारताच मुंबईतील आस्थापनांवर ठळकपणे दिसतील अशा देवनागरी लिपीत मराठी पाट्या झळकण्यास सुरुवात झाली आहे.? पी–पूर्व विभागातील दुकानदाराने तातडीने मराठी पाटी लावली. दरम्यान, मराठी पाट्या लावण्याकडे दुर्लक्ष करणाऱ्या आस्थापनावर दंडात्मक कारवाई पुढेही सुरूच राहणार, असा इशारा विधी समिती अध्यक्षा दीक्षा कारकर यांनी दिला आहे. मुंबईत ९ लाखांहून अधिक




आस्थापना असून दुकानाच्या बाहेर ठळकपणे दिसतील अशा देवनागरी लिपीत मराठी पाट्या लावणे सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार बंधनकारक आहे. मराठी पाटी अस्थापनावर नसल्यास कारवाईचा बडगा उगारण्यात येत आहे. २८ नोव्हेंबर २०२३ ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत १,५८,११६ भेटी दिल्या. त्यापैकी १,५३,०९६ आस्थापनांमध्ये अधिनियमातील तरतुदींनुसार नामफलक प्रदर्शित केल्याचे आढळले तर ५,०२० आस्थापनांना अधिनियमातील तरतुदींनुसार नामफलक प्रदर्शित न केल्याबाबत निरीक्षण अहवाल देण्यात आले.

---

## जाहीर नोटीस

**बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वरुड येथील श्री.व्ही.व्ही.राजुरकर, सहदिवाणी न्यायाधीश ( क.स्तर ) वरुड यांचे न्यायालयात**

**एम.जे.सी.क्रं.३५९/२०२६** **ने.ता.१७/०६/२०२६**

**अर्जदार :-** १) नर्मदा विष्णू झाडे, वय अं.७२ वर्ष, धंदा–घरकाम, २) मोहीत प्रविण झाडे, वय अं.११ वर्ष, धंदा–शिक्षण, अ.पा.क.अर्जदार क्र.२ करिता अर्जदार क्र.१ अर्जदार क्र.१ व २ रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती

**... विरुध्द ...**

**गैरअर्जदार :-** **निरंक**

ज्याअर्थी अर्जदार यांनी **मयत प्रविण विष्णू झाडे, रा.लोणी, ता.वरुड, जि.अमरावती** यांचे अर्जदार हे कायदेशीर वारसदार म्हणुन घोषित करण्याकरीता विद्यमान न्यायालयात बॉम्बे रेग्युलेशन १८२७ चे कलम ८ अन्वये वारस हक्क प्रमाणपत्र मिळण्याबाबत अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी ज्या कोणास वरील अर्जदार यांचे विरुध्द काही आक्षेप किंवा हरकत घ्यावयाची असेल तर त्यांनी नोटीस प्रसिध्दीपासुन ३० दिवसाचे आत किंवा **दि.१७/०६/२०२६** रोजी सकाळी १०.३० वाजता वरुड न्यायालयात व्यक्तिगत किंवा रितसर निर्दीष्ट केलेल्या वकीलामार्फत हजर राहावे तसे न केल्यास उक्त अर्जाची सुनावनी होवुन निकाल दिला जाईल.

आज तारीख /०५/२०२६ रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**आदेशानुसार**
**सहाय्यक अधिक्षक**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय, वरुड**

---

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु–१/कावी–१६२/२६** **दि.०४/०५/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **मुरली नारायण आंडे, रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म–मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **वडील नामे नारायण सिताराम आंडे, रा.मालखेड, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा मृत्यू दि.०१/०८/२०२४** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म–मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **०४/०५/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

---

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु–१/कावी–१०५/२६** **दि.१६/०४/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **बाबाराव लक्ष्मण ठाकरे, रा.जामगाव ( ख ), ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत जामगाव ( ख ), ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म–मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे बाबाराव लक्ष्मण ठाकरे, रा.जामगाव ( ख ), ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.१४/०७/१९५९** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म–मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **१६/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**

---

## जाहीर नोटीस

### तहसिलदार तथा तालुका दंडाधिकारी, वरुड यांचे न्यायालय

**क्र.प्रस्तु–१/कावी–१३१/२६** **दि.२७/०४/२६**

**जाहीरनामा :-**

याद्वारे सर्व लोकांना कळविण्यात येते की, **सैय्यद मुख्तार सैय्यद मुकद्दर अली, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी **ग्रामपंचायत आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती** यांनी जन्म–मृत्यु नोंदणी अधिनीयम १९६९ व सुधारणा अधिनीयम २०२३ अन्वये विलंबाने करावयाच्या जन्म मृत्यू नोंद करण्याबाबत विहीत अर्ज या कार्यालयात सादर केलेला आहे. सदर अर्जात अर्जदार यांनी **स्वत: नामे सैय्यद मुख्तार सैय्यद मुकद्दर अली, रा.आमनेर, ता.वरुड, जि.अमरावती, यांचा जन्म दि.०३/०७/१९७५** नोंद करण्यासाठी आदेश होण्यासाठी अर्ज सादर केलेला आहे. न्यायालयाच्या आदेशानुसार जन्म–मृत्यू चे नोंद घ्यावी या करीता सदरहू प्रकरण रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ डेथ ॲक्ट १९६९ च्या कलम १३ (३) नुसार जन्म मृत्यूची नोंद होण्यासाठी न्यायालयीन आदेश होण्याबाबत अर्ज दाखल केलेला आहे.

सदर विषयी ज्या कोणास हरकत वा आक्षेप घ्यावयाचे असल्यास जाहीरनामा प्रसिद्ध झाल्यापासुन ३० दिवसाचे आत लेखी स्वरुपात समक्ष हजर राहुन या न्यायालयात स्वत: किंवा वकीलामार्फत हजर हरकत दाखला करावी अन्यथा प्रकरणात उक्त अर्जाची सुनावणी होऊन निकाल दिला जाईल.

आज रोजी **२७/०४/२०२६** रोजी माझे सहीने व न्यायालयाचे शिक्क्यानिशी दिले.

न्यायालयाचा शिक्का

**तहसिलदार**
**वरुड**




### भारत-नेदरलँड्समध्ये १७ करारांवर स्वाक्षरी

# पंतप्रधान मोदी आणि रॉब जेटेन यांच्यात द्विपक्षीय चर्चा

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**द हेग :** - भारत आणि नेदरलँड्समध्ये संरक्षण, महत्त्वपूर्ण खनिजे, सेमीकंडक्टर आणि इतर प्रमुख क्षेत्रांमध्ये सहकार्य वाढवण्यासाठी १७ करारांवर स्वाक्षरी करण्यात आली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि नेदरलँड्सचे पंतप्रधान रॉब जेटेन यांच्यात शनिवारी संध्याकाळी झालेल्या द्विपक्षीय चर्चेदरम्यान दोन्ही देशांमध्ये दोन्ही नेत्यांनी 'धोरणात्मक भागीदारी आराखडा' जारी केला आहे. व्यापार, गुंतवणूक, अंतराळ, कृत्रिम बुद्धिमत्ता (एआय) आणि क्वांटम कम्प्युटिंग या क्षेत्रांतील सहकार्याचा यात समावेश आहे. संरक्षण क्षेत्रात तंत्रज्ञान हस्तांतरण आणि संयुक्त उपक्रमांच्या माध्यमातून उपकरणे आणि यंत्रणांच्या संयुक्त उत्पादनासाठी एक संरक्षण औद्योगिक आराखडा तयार करण्यावर दोन्ही देशांचे एकमत झाले आहे. या बैठकीत दोन्ही पंतप्रधानांनी पश्चिम आशियातील परिस्थिती आणि जागतिक ऊर्जा पुरवठा व व्यापार नेटवर्कवर होणाऱ्या त्याच्या गंभीर परिणामांबद्दल तीव्र चिंता व्यक्त केली. त्यांनी होर्मुझ सामुद्रधुनीतून मुक्त दळणवळण आणि जागतिक व्यापाराच्या प्रवाहाचे समर्थन केले आणि कोणत्याही प्रतिबंधात्मक उपायांना विरोध दर्शवला.

# 'इबोला'च्या उद्रेकामुळे आरोग्य आणीबाणी घोषित

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**अबूजा :-** काँगो आणि शेजारील युगांडा देशात इबोला आजाराचा उद्रेक झाल्यामुळे 'जागतिक आरोग्य संघटने'ने रविवारी आंतरराष्ट्रीय चिंतेची सार्वजनिक आरोग्य आणीबाणी घोषित केली आहे. या भागात इबोलाचे ३०० हून अधिक संशयित रुग्ण आढळले असून ८८ जणांचा मृत्यू झाला आहे.




जागतिक आरोग्य संघटनेचे महासंचालक टेड्रोस अधानोम घेब्रेयेसस यांनी ही घोषणा केली. सोशल मीडिया मंच एक्सवरील एका पोस्टमध्ये संघटनेने स्पष्ट केले की, हा उद्रेक कोविड-१९ महामारीसारखा महामारी आणीबाणीच्या निकषांमध्ये बसत नाही, त्यामुळे आंतरराष्ट्रीय सीमा बंद न करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. काँगोची राजधानी किनशासा येथे प्रयोगशाळेत तपासणी केलेला एक रुग्ण पॉझिटिव्ह आढळला असून हे ठिकाण पूर्वेकडील इतुरी प्रांतातील उद्रेकाच्या मुख्य केंद्रापासून सुमारे १,००० किलोमीटर दूर आहे.

त्यामुळे हा संसर्ग अधिक वेगाने पसरत असल्याचे संकेत मिळत आहेत. याशिवाय काँगोमधील सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या आणि इतुरी प्रांताच्या सीमेला लागून असलेल्या उत्तर किवू प्रांतातही इतर संशयित रुग्ण आढळले आहेत.

# नीट पेपरफुटी प्रकरण : मनीषा मांढरेला १४ दिवसांची कोठडी

(प्रतिनीधी वरुड दर्पण)

**नवी दिल्ली** - राष्ट्रीय पात्रता प्रवेश परीक्षा म्हणजेच नीट-यूजी २०२६ च्या पेपरफुटी प्रकरणातील मुख्य संशयित आरोपी आणि राष्ट्रीय परीक्षा एजन्सीची पॅनेलिस्ट मनीषा मांढरे हिला दिल्लीतील राऊस एव्हेन्यू न्यायालयाने १४ दिवसांची सीबीआय कोठडी सुनावली आहे. वनस्पतीशास्त्राची अध्यापिका असलेल्या मांढरे हिने मनीषा वाघमारे आणि प्रल्हाद विठ्ठलराव कुलकर्णी या सहआरोपींच्या मदतीने निवडक विद्यार्थ्यांना मोठ्या



रक्कमेच्या मोबदल्यात परीक्षेचे प्रश्न आणि मजकूर पुरवल्याचा आरोप आहे.

या खळबळजनक प्रकरणातील मोठा कट आणि पेपरफुटीचा मुख्य स्रोत शोधण्यासाठी सीबीआयने न्यायालयाकडे मांढरे हिच्या कोठडीची मागणी केली होती. विशेष न्यायाधीश कोलेट रश्मी कुजूर यांनी ती मान्य केली.

# संघ मुख्यालयापासून अवघ्या दीड किलोमीटर गोळीबाराचा थरार

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### तर एमआयडीसीमध्ये एकच ठिकाणी ४ दिवसात दोघांना संपवलं

***नागपूर*** - नागपूर शहरात पुन्हा एकदा गुन्हेगारीने तोंडवर काढलं आहे का? असा प्रश्न आता सर्वसाधारण नागपूरकरांना पडला आहे. कारण नागपूरच्या मध्यवर्ती भागात असलेल्या महालाच्या कोठीरोड परिसरात गोळीबाराची घटना घडली आहे. रविवारच्या रात्रीच्या सुमारास घडलेलंय या घटनेमुळे शहरात एकच खळबळ उडाली असून परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे. रात्री साडे अकरा ते बाराच्या सुमारास हि घटना घडल्याची प्राथमिक माहिती आहे.



तीन बाईकवर आलेल्या सहा जणांनी दोनदा केलं फायरिंग मिळालेल्या माहितीनुसार, तीन बाईकवर आलेल्या सहा जणांनी दोनदा फायरिंग केल्याची माहिती आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, सौरभ नावाच्या फिर्यादीने सांगितल्याप्रमाणे रवी मोहतो, गंगा काकडे यांनी फायरिंग केल्याची माहिती आहे. वर्चस्व, दहशत पसरविण्यासाठी हि फायरिंग केल्याचे बोललं जात आहे. दरम्यान, यातील संशयित आरोपी गुन्हेगारी पार्श्वभूमीचे असून अमली पदार्थ विक्री आणि बाळगण्याचे त्यांच्यावर गुन्हे आहेत. त्यांच्यातील अंतर्गत वादातून हि फायरिंगची घटना घडल्याचे बोलले जात आहे. धक्कादायक बाब म्हणजे. नागपूरच्या संघ कार्यालयापासून अवघ्या दिड किलोमीटर अंतरावर हि घटना घडल्याने परिसरात भीतीच वातावरण निर्माण झालं आहे. सध्या पोलीस या प्रकारणाचा तपास कोतवाली पोलीस करत असून तपासाअंती या प्रकरणाचे सत्य समजू शकणार आहे.

एकच ठिकाणी चार दिवसात दोघांची दगडाने ठेचून हत्या दुसरीकडे, नागपूरच्या एमआयडीसी पोलीस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या माधवनागरी परिसरात एकच ठिकाणी चार दिवसात दोघांची दगडाने ठेचून हत्या करण्यात आली आहे. या घटनेमुळे परिसरात भीतीचे वातावरण पसरलं आहे. रविवारी रात्री ८ वाजताच्या सुमारास अंकुश शेंडे याची अज्ञात आरोपीने दगडाने ठेचून हत्या केलीय. अंकुश हा मजूर असून त्याला दारूचे वेसण होते. तर गुरुवारी याच ठिकाणी आकाश बरडे याची देखील अशाच पद्धतीने दगडाने ठेचून हत्या करण्यात आली होती.


# घरातुन बाहेर पडलेल्या तिन्ही अल्पवयीन परतल्या

(प्रतिनिधी वरुड दर्पण)

### नातेवाईकांसह पोलिसांनी सोडला सुटकेचा श्वास

**वरुड** - मावशीच्या गावी जातो, असे सांगुन घरातुन पडलेल्या एकाच कुटुंबातील तीन अल्पवयीन मुली गुढरित्या बेपत्ता झाल्याची धक्कादायक घटना समोर आली होती. इया प्रकरणी मुलींच्या काकांनी दिलेल्या तक्रारीवरुन बेनोड पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध अपहरणाचा गुन्हा दाखल होता परंतु पोलिसांनी या मुलींचा शोध घेत तिघींनाही आपआपल्या घरी सुखरुप परत आल्या आहेत.

प्राप्त माहितीनुसार, फिर्यादीच्या मोठ्या भावाच्या दोन मुली (वय १४ वर्ष आणि १७ वर्ष) तसेच त्यांच्या धाकट्या भावाची एक मुलगी (वय १५ वर्ष) अशा तिघींनी घरातुन निघतांना 'आम्ही वरुड येथे मावशीकडे जातो',असे आपल्या आजीला (फिर्यादीच्या आईला) सांगितले होते. मात्र, बराच वेळ होऊनही त्या मावशीकडे पोहोचल्या नाहीत आणि घरीही परतल्या नाहीत. मुली घरी न परतल्याने नातेवाईकांनी सर्वत्र शोध घेतला.



नातेवाईक, मित्रमंडळी आणि वरुड येथील मावशीकडे चौकशी केली असता त्या तिथे पोहोचल्याच नसल्याचे समोर आले. तिन्ही मुलींचा कोणताही थांगपत्ता न लागल्याने अखेर कुटुंबाने पोलिसांत धाव घेतली. कोणीतरी अज्ञात इसमाने या तिन्ही अल्पवयीन मुलींना कशाचे तरी आमिष दाखवुन किंवा फुस लावुन पळवुन नेले असावे, असा संशय फिर्यादीने व्यक्त केल्यावरुन बेनोडा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध भादंवि १३७ (२) भा.न्या.सं.अन्वये गुन्हा दाखल केला करुन तपास ठाणेदार विवेक देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली बेनोडा पोलिसांनी सुरु केला होता परंतु या तिन्ही मुली नातेवाईकांकडे सापडल्या असून तिघींनाही आपआपल्या घरी सुखरुप परत पोहचविण्यात आले आहे.

